असा. क्र. ४९

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००१

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, एप्रिल २७, २००१/वैशाख ७, शके १९२३

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ एप्रिल २००१

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक दुविप्र. १६९९/प्र.क्र. (४७/९९) पदुम-६.—भारताच्या संविधानांच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून व त्याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा विलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत असलेल्या दुग्धव्यवसाय विकास विभागातील अप्पर दुग्धव्यवसाय विकास आयुक्त, महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना, सर्वसाधारण राज्य सेवा, गट-अ मधील वरिष्ठ प्रशासकीय श्रेणीतील पदे, सर्वसाधारण राज्य सेवा वरिष्ठ गट-अ मधील कनिष्ठ प्रशासकीय श्रेणीतील पदे, सर्वसाधारण राज्य सेवा, गट-अ (कनिष्ठ), सर्वसाधारण राज्य सेवा, गट-ब (तांत्रिक गट), सर्वसाधारण राज्य सेवा, गट-ब (प्रशासन गट) आणि दूध प्रापण व वितरण (कार्यकारी गट) सर्वसाधारण राज्य सेवा, गट-ब या पदांवरील सेवा प्रवेशनाचे विनियमन करणारे खालील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, दुग्धव्यवसाय विकास विभागातील विवक्षित राजपत्रित पदांचे (सेवाप्रवेश) नियम, २००१ असे म्हणावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " आयोग " म्हणजे, महाराष्ट्र लोकसेवा आयोग ;

(ब) " विभाग " म्हणजे, महाराष्ट्र शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत दुग्धव्यवसाय विकास विभाग ;

(क) " पदवी " म्हणजे, सांविधिक विद्यापीठाची पदवी ;

(ड) " समतुल्य संवर्ग " म्हणजे महाराष्ट्र शासनाने समतुल्य म्हणून मान्यता दिलेला संवर्ग किंवा श्रेणी ;

(इ) " शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(फ) " आय. डी. डी. " म्हणजे, इंडियन डेअरी डिप्लोमा ;

(ग) " अनुसूची " म्हणजे या नियमांना जोडलेली अनुसूची.

३. विभागातील अप्पर आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य या पदावरील नियुक्ती एकतर,—

(अ) महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना हे पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधून योग्य व्यक्तीची निवड करून तिला पदोन्नती देऊन, अथवा

(ब) भारतीय प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ श्रेणीतील योग्य अधिकाऱ्यांची बदली करून, करण्यात येईल.

४. विभागातील महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना या पदावरील नियुक्ती एकतर,—

(अ) अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वरिष्ठ प्रशासकीय श्रेणीतील कोणतेही पद धारण करणाऱ्या आणि त्या संवर्गामध्ये तीन वर्षांपेक्षा कमी नाही एवढी नियमित सेवा झालेल्या व्यक्तींमधून योग्य व्यक्तीची निवड करून तिला पदोन्नती देऊन ; अथवा

(ब) शासनाच्या सेवेतील समतुल्य संवर्गातील आणि खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता आणि अनुभव धारण करणाऱ्या योग्य व्यक्तींची बदली करून करण्यात येईल :—

(१) बी. एस.सी. (ॲग्रीकल्चर), अथवा

(२) बी. टेक. (डेअरी टेक्नॉलॉजी), अथवा

(३) बी. व्ही. एस.सी. (व्हेटर्नरी सायन्स), अथवा

(४) बी. एस.सी. (फूड टेक्नॉलॉजी) आणि आय. डी. डी. अथवा

(५) बी. एस. सी. (न्युट्रीशन) आणि आय. डी. डी. अथवा

(६) बी. एस.सी. (बायो केमिस्ट्री) आणि आय. डी. डी. अथवा

(७) बी. एस.सी. (केमिस्ट्री) आणि आय. डी. डी. अथवा

(८) बी. एस.सी. (मायक्रो बायोलॉजी) आणि आय. डी. डी. अथवा

(९) प्रतिदिन एक लाख लिटर प्रक्रिया क्षमता असलेल्या शासकीय किंवा अन्य दुग्धशाळेतील दूध प्रक्रिया यंत्रणेतील किमान तीन वर्षांच्या अनुभवासह आय. डी. डी. अथवा

(क) आवश्यक असल्यास, भारतीय प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ श्रेणीतील योग्य अधिकाऱ्याची बदली करून ; करण्यात येईल.

५. अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, विभागातील वरिष्ठ प्रशासकीय श्रेणी म्हणून एकत्र केलेल्या (१) उप आयुक्त दुग्धव्यवसाय विकास (प्रापण व उत्पादन), अथवा (२) उप आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास (प्रक्रिया आणि वितरण), अथवा (३) उप आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास (प्रशासन), अथवा (४) नियंत्रक, दूध प्रापण आणि वितरण या पदांवरील नियुक्ती एकतर,—

(अ) अनुसूची दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही पद धारण करणाऱ्या आणि अनुसूची दोन मध्ये अनुक्रमांक १ ते १० या वरिष्ठ गट-अ या पदावरील नियमित सेवेचे तीन वर्षांहून कमी नसेल इवढा अनुभव असलेल्या आणि अनुक्रमांक ११ते १५ या पदांवरील ५ वर्षांहून कमी नसेल एवढा अनुभव असलेल्या व्यक्तींमधून योग्य व्यक्तीची निवड करून तिला पदोन्नती देऊन ; अथवा

(ब) शासनाच्या सेवेतील समतुल्य संवर्गातील आणि नियम ४ च्या खंड (ब) मध्ये विहित केलेली शैक्षणिक अर्हता आणि अनुभव धारण करणाऱ्या योग्य व्यक्तीची बदली करून ; करण्यात येईल.

६. अनुसूची तीन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, विभागातील कनिष्ठ प्रशासकीय श्रेणीतील पदांवरील नियुक्ती एकतर,—

(अ) अनुसूची चार आणि पाच मध्ये विनिर्दिष्ट केलेली गट-अ मधील पदे धारण करणाऱ्या आणि त्या श्रेणीत तीन वर्षांपेक्षा कमी नाही एवढी नियमित सेवा झालेल्या आणि पदवीधारक किंवा आय.डी.डी. धारक असलेल्या व्यक्तीमधून योग्य व्यक्तीची निवड करून तिला पदोन्नती देऊन , अथवा

(ब) शासनाच्या सेवेतील समतुल्य संवर्गातील व नियम ४ च्या खंड (ब) मध्ये विहित केलेली शैक्षणिक अर्हता आणि अनुभव धारण करणाऱ्या योग्य व्यक्तींची बदली करून ; अथवा

(क) जे उमेदवार,—

(एक) अगोदरच शासनाच्या सेवेत असतील तर त्यांचे वय ४० वर्षांपेक्षा जास्त नसेल ;

(दोन) नियम ४ च्या खंड (ब) मध्ये विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत असतील ;

(तीन) खंड (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता प्राप्त केल्यानंतर मिळवलेला, दुग्धशाळेतील आणि पशुसंवर्धनातील कर्मचारी व कामगार यांना हाताळण्याचा १० वर्षांपेक्षा कमी नसेल एवढा अनुभव धारण करीत असतील,

अशा उमेदवारामधून नामनिर्देशन करून ; करण्यात येईल.

७ अनुसूची पाच मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, विभागातील कनिष्ठ गट-अ मधील पदांवरील नियुक्ती एकतर,—

(अ) अनुसूची सहा आणि सात मध्ये विनिर्दिष्ट केलेली गट-ब मधील पदे धारण करणाऱ्या आणि तीन वर्षांपेक्षा कमी नाही एवढी गट-ब पदावरील नियमित सेवा झालेल्या व्यक्तींमधून, पात्रतेच्या अधीन जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन ; अथवा

(ब) शासनाच्या कोणत्याही विभागातील समतुल्य संवर्गातील व या नियमाच्या खंड (क) च्या उप-खंड (दोन) आणि (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या योग्य अधिकाऱ्यांची बदली करून ; अथवा

(क) जे उमेदवार,—

(एक) अगोदरच शासनाच्या सेवेत नसतील तर ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा जास्त नसेल ;

(दोन) नियम ४ च्या खंड (ब) मध्ये विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत असतील ;

(तीन) खंड (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता प्राप्त केल्यानंतर मिळवलेला, प्रतिदिन ५०,००० लिटर पेक्षा कमी नाही एवढी प्रक्रिया क्षमता असलेल्या दुग्धशाळेतील ५ वर्षांपेक्षा कमी नसेल एवढा अनुभव धारण करीत असतील व त्यापैकी तीन वर्षांचा अनुभव, आयोगाच्यामते, विभागातील गट-ब तांत्रिक पदाला समतुल्य पदावरील असेल ;

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशन करून ; करण्यात येईल.

८. अनुसूची सहा व सात मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, विभागातील सर्वसाधारण राज्य सेवा, तांत्रिक गटातील गट-ब पदावरील नियुक्ती एकतर,—

(अ) अनुसूची आठ मध्ये विनिर्दिष्ट केलेली गट-क मधील पदे धारण करणाऱ्या आणि अनुसूची आठ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, विभागातील तांत्रिक गटातील गट-क पदावरील नियमित सेवेचा तीन वर्षांपेक्षा कमी नसेल एवढा अनुभव असलेल्या व्यक्तींमधून पात्रतेच्या अधीन राहून जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन ; अथवा

(ब) शासनाच्या कोणत्याही विभागातील समतुल्य संवर्गातील व या नियमातील खंड (क) चे उप-खंड (दोन) आणि (तीन) मध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या व्यक्तींमधून योग्य अधिकाऱ्याची बदली करून ; अथवा

(क) जे उमेदवार,—

(एक) अगोदरच शासनाच्या सेवेत नसतील तर ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा जास्त नसेल ;

(दोन) नियम ४ च्या खंड (ब) मध्ये विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत असतील ;

(तीन) खंड (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता प्राप्त केल्यानंतर मिळवलेला, अनुसूची आठ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गट-क शी समतुल्य पदावरील, प्रतिदिन ५०,००० लिटर पेक्षा कमी नाही एवढी प्रक्रिया क्षमता असलेल्या दुग्धशाळेतील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल एवढा अनुभव धारण करीत असतील ;

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशन करून ; करण्यात येईल.

९. अनुसूची नऊ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, विभागातील पदांवरील नियुक्ती एक तर,—

(अ) गट-क मधील अधीक्षक संवर्गातील अधीक्षक हे पद धारण करणाऱ्या आणि विभागात अधीक्षक म्हणून ३ वर्षांपेक्षा कमी नसेल एवढी नियमित सेवा झालेल्या व्यक्तींमधून, पात्रतेच्या अधीन राहून, ज्येष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन ; अथवा

(ब) शासनाच्या कोणत्याही विभागातील समतुल्य संवर्गातील व या नियमातील खंड (क) च्या उपखंड (दोन) आणि (तीन) मध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या योग्य अधिकाऱ्याची बदली करून ; अथवा

(क) जे उमेदवार,—

(एक) अगोदरच शासनाच्या सेवेत नसतील तर ज्यांचे वय ३० वर्षापेक्षा जास्त नसेल ;

(दोन) नियम ४ च्या खंड (ब) मध्ये विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत असतील ;

(तीन) खंड (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता प्राप्त केल्यानंतर मिळवलेला, विभागातील गट -क मधील कार्यालय अधीक्षक या पदाशी समतुल्य पदावरील, प्रतिदिन ५०,००० लिटरपेक्षा कमी नाही एवढी प्रक्रिया क्षमता असलेल्या दुग्धशाळेतील ३ वर्षापेक्षा कमी नसेल एवढा अनुभव धारण करीत असतील,

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशन करून ; करण्यात येईल.

१०. विभागातील दूध प्रापण आणि वितरण अधिकारी किंवा दूध वितरण अधिकारी या पदावरील नियुक्ती एकतर,—

(अ) गट-क संवर्गामध्ये सहायक दूध वितरण अधिकारी/विस्तार अधिकारी/बाजार अधीक्षक/दूध प्रापण अधिकारी यापैकी कोणतेही पद धारण करणाऱ्या आणि विभागात ३ वर्षापेक्षा कमी नसेल एवढी नियमित सेवा झालेल्या व्यक्तीमधून पात्रतेच्या अधीन राहून, ज्येष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन ; अथवा

(ब) शासनाच्या कोणत्याही विभागातील समतुल्य संवर्गातील व या नियमातील खंड (क) च्या उपखंड (दोन) आणि (तीन)मध्ये नामनिर्देशनासाठी विनिर्दिष्ट केलेली अर्हता आणि अनुभव धारण करणाऱ्या योग्य अधिकाऱ्याची बदली करून ; अथवा

(क) जे उमेदवार,—

(एक) अगोदरच शासनाच्या सेवेत नसतील तर ज्यांचे वय ३० वर्षापेक्षा जास्त नसेल ;

(दोन) नियम ४ च्या खंड (ब) मध्ये विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत असतील ;

(तीन) विभागातील सहायक दूध वितरण अधिकारी/विस्तार अधिकारी/बाजार अधीक्षक/दुध प्रापण अधिकारी या पदांशी समतुल्य असलेल्या पदांवरील ३ वर्षाचा अनुभव धारण करीत असतील ;

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशन करून ; करण्यात येईल.

११. नियम ७, ८, ९ आणि १० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अपवादात्मक अर्हता अथवा अनुभव अथवा दोन्ही धारण करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत शासन, आयोगाच्या शिफारशीनुसार या नियमांमध्ये विहित केलेली वयोमर्यादा व अनुभवाची अट शिथिल करू शकेल.

१२. नियम ७, ८, ९ आणि १० च्या खंड (क) च्या उपखंड (तीन) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अनुसूचित जाती, बौद्धधर्मांतरीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यातील उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी आवश्यक अनुभव असलेले उमेदवार पुरेशा संख्येत उपलब्ध नसल्याचे निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर आयोगाचे मत झाल्यास, आयोग अशा निवड प्रकरणी, त्या नियमांमध्ये ठरवून दिलेली अनुभवाच्या कालावधी बाबतची आवश्यकता शिथिल करू शकेल आणि अशा जातींच्या किंवा जमातींच्या योग्य उमेदवारांची निवड करू शकेल.

१३. नियम ६, ७, ८, ९ आणि १० मध्ये नमूद केलेल्या पदांवरील नियुक्ती पदोन्नतीने आणि नामनिर्देशनाने ५० : ५० या प्रमाणात करण्यात येईल.

१४. नियम ६, ७, ८, ९ आणि १० मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाने नियुक्त केलेली व्यक्ती दोन वर्षांच्या परिवीक्षा कालावधीवर असेल. परिवीक्षा कालावधी जास्तीत जास्त एक वर्षापर्यंतच वाढविता येईल. जर ती व्यक्ती, विहित कालावधीत परिवीक्षा कालावधी यशस्वीरीत्या पूर्ण करु शकली नाही अथवा विभागीय परीक्षा उत्तीर्ण होऊ शकली नाही अथवा परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट मिळवू शकली नाही अथवा त्या पदाकरिता योग्य नसल्याचे आढळले तर, पूर्वसूचना न देता तिला सेवेतून काढून टाकण्यास ती पात्र ठरेल.

१५. नियम ३, ४, ५, ६, ७, ८, ९ आणि १० मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने अथवा बदलीने अथवा नामनिर्देशनाने नियुक्त केलेल्या व्यक्तीला, जर ती अगोदरच परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली नसेल तर, विभागीय परीक्षा आणि हिंदी व मराठी भाषा परीक्षा, त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण करणे आवश्यक असेल.

१६. नियम ४, ५, ६, ७, ८, ९ आणि १० मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

## अनुसूची १

### वरिष्ठ प्रशासकीय श्रेणीतील पदे

### (वेतनश्रेणी रु. १२,०००—१६,५००)

(१) उपायुक्त, दुग्धव्यवसाय विकास (प्रक्रिया व वितरण)

(२) उपायुक्त, दुग्धव्यवसाय विकास (प्रापण व उत्पादन)

(३) उपायुक्त, दुग्धव्यवसाय (प्रशासन)

(४) नियंत्रक (दूध प्रापण व वितरण)

(५) वरिष्ठ दुग्धशाळा अभियंता

(६) नियंत्रक, दूध परिवहन

(७) उपायुक्त, दुग्धव्यवसाय विकास पदाशी समतुल्य असलेले पद म्हणून शासनाकडून वेळोवेळी घोषित करण्यात येणारे कोणतेही पद.

## अनुसूची २

### कनिष्ठ प्रशासकीय श्रेणीतील पदे

### (वेतनश्रेणी रु. १०,६५०—१५,८५०)

(१) प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी

(२) दुग्धव्यवसाय विकास अधिकारी (विस्तार)

(३) सहायक आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास (गुणनियंत्रण)

(४) प्राचार्य, दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे
(५) मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे
(६) प्रकल्प अधिकारी, दुग्धप्रकल्प, दापचरी
(७) दुग्धशाळा तंत्रज्ञ
(८) दुग्धशाळा व्यवस्थापक, कुर्ला/वरळी किंवा श्रेणी-१ मधील दुग्धशाळा
(९) नियंत्रक, गुरे नियंत्रण योजना
(१०) विशेष कार्य अधिकारी (रेल्वे टर्मिनल प्रकल्प)
(११) प्रधान पशुसंवर्धन अधिकारी (रु. १०,०००–१५,२००)
(१२) पशुधन खरेदी अधिकारी
(१३) व्यवस्थापक, पशुपैदास व संगोपन केंद्र, पालघर
(१४) पशुसंवर्धन अधिकारी
(१५) प्राचार्य, दुग्धशाळा व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका संस्था, दापचरी.

## अनुसूची ३

### कनिष्ठ प्रशासकीय श्रेणी

### (वेतनश्रेणी रु. १०,६५०–१५,८५०)

(१) प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी
(२) दुग्धव्यवसाय विकास अधिकारी (विस्तार)
(३) सहायक आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास (गुणनियंत्रण)
(४) प्राचार्य, दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे
(५) मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे
(६) प्रकल्प अधिकारी, दुग्धप्रकल्प, दापचरी
(७) दुग्धशाळा तंत्रज्ञ
(८) दुग्धशाळा व्यवस्थापक, कुर्ला/वरळी किंवा श्रेणी-१ मधील दुग्धशाळा
(९) नियंत्रक, गुरे नियंत्रण योजना
(१०) विशेष कार्य अधिकारी (रेल्वे टर्मिनल प्रकल्प).

## अनुसूची ४

### वर्ग-१ मधील पदांची यादी

### (वेतनश्रेणी रु. ८,०००–१३,५००)

(१) महाव्यवस्थापक, शासकीय दूध योजना
(२) सहायक आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास (दूध महापूर)

(३) उप दुग्धशाळा व्यवस्थापक
(४) गुणनियंत्रण अधिकारी
(५) दुग्धव्यवसाय विकास अधिकारी (मुख्यालय)
(६) प्रधान कृषि-अधिकारी
(७) वैरण विकास अधिकारी
(८) दुग्धव्यवसाय विकास अधिकारी (दुग्धशाळा व्यवस्थापन व पशुसंवर्धन)
(९) जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी
(१०) वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी
(११) सहायक आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास (सामग्री)
(१२) विशेष अधिकारी (अंदाजपत्रक)
(१३) उप संचालक (प्रशासन), बृहन्मुंबई दूध योजना
(१४) विशेष कार्य अधिकारी
(१५) उप नियंत्रक (प्रापण व वितरण)
(१६) उप नियंत्रक (प्रशासन)
(१७) महाव्यवस्थापक, श्रेणी-२ मधील दुग्धशाळा
(१८) सहायक पशुसंवर्धन अधिकारी (८,०००–१३,५००)
(१९) व्यवस्थापक, (गोशाळा/वत्स्यक्षेत्र) (८,०००–१३,५००)
(२०) मुख्य दक्षता अधिकारी (७,४५०–११,५००)
(२१) दुग्धव्यवसाय विकास विभागातील कमीत कमी वेतनश्रेणी रु. ७,४५० व त्यापुढील वेतनश्रेणीतील पदे.

## अनुसूची ५

### वर्ग-१ मधील पदांची यादी

### (वेतनश्रेणी रु. ८,०००–१३,५००)

(१) महाव्यवस्थापक, शासकीय दूध योजना
(२) सहायक आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास (दूध महापूर)
(३) उप दुग्धशाळा व्यवस्थापक
(४) गुणनियंत्रण अधिकारी
(५) दुग्धव्यवसाय विकास अधिकारी (मुख्यालय)
(६) प्रधान कृषि-अधिकारी
(७) वैरण विकास अधिकारी
(८) दुग्धव्यवसाय विकास अधिकारी (दुग्धशाळा व्यवस्थापन व पशुसंवर्धन)
(९) जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी

(१०) वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी
(११) सहायक आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास (सामग्री)
(१२) विशेष अधिकारी (अंदाजपत्रक)
(१३) उप संचालक (प्रशासन), बृहन्मुंबई दूध योजना
(१४) विशेष कार्य अधिकारी
(१५) उप नियंत्रक (प्रापण व वितरण)
(१६) उप नियंत्रक (प्रशासन)
(१७) दुग्ध व्यवसाय विकास विभागातील कमीत कमी वेतनश्रेणी रु. ७,४५० व त्यापुढील वेतनश्रेणीतील पदे
(१८) महाव्यवस्थापक, श्रेणी-२ मधील दुग्धशाळा.

## अनुसूची ६

### वर्ग-२ संवर्गातील पदांची यादी
### (वेतनश्रेणी रु. ६,५००–१०,५००)

(१) दुग्धशाळा व्यवस्थापक
(२) दुग्धशाळा व्यवस्थापक (चीज), मिरज, जिल्हा सांगली
(३) उप दुग्धशाळा व्यवस्थापक
(४) सहायक दुग्धशाळा व्यवस्थापक
(५) सहायक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी (तंत्रज्ञान)
(६) दूध प्रापण अधिकारी
(७) प्रशिक्षण अधीक्षक (दुग्धशाळा तंत्र)
(८) जीव रसायन शास्त्रज्ञ
(९) सहायक अणुजीव शास्त्रज्ञ
(१०) दुग्धशाळा रसायन शास्त्रज्ञ
(११) प्रशिक्षण अधीक्षक (गुण नियंत्रण)
(१२) सहायक गुणनियंत्रण अधिकारी
(१३) कृषीक्षेत्र अधीक्षक
(१४) सहायक वैरण विकास अधिकारी
(१५) सहायक आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास (प्रशासन)
(१६) सहायक आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास (सर्वसाधारण)
(१७) सहायक अर्थसंकल्प अधिकारी
(१८) मेळ अधिकारी

(१९) जनसंपर्क अधिकारी

(२०) सहायक कार्यकारी अधिकारी

(२१) अनुज्ञाप्ति अधिकारी

(२२) भांडार अधिकारी

(२३) प्रशासकीय अधिकारी

(२४) सहायक संचालक (कर्मचारी वृंद) ,

(२५) सहायक संचालक (सर्वसाधारण)

(२६) सहायक संचालक (प्रशासन)

(२७) सहायक प्रकल्प अधिकारी

(२८) दूध प्रापण व वितरण अधिकारी

(२९) दूध वितरण अधिकारी

(३०) सहायक जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी

(३१) महाव्यवस्थापक, श्रेणी-३ मधील दुग्धशाळा.

## अनुसूची ७

### वर्ग-२ मधील पदांची यादी (तांत्रिक गट)

### (वेतनश्रेणी रु. ६,५००–१०,५००)

(१) दुग्धशाळा व्यवस्थापक

(२) दुग्धशाळा व्यवस्थापक (चीज), मिरज, जिल्हा सांगली

(३) उप दुग्धशाळा व्यवस्थापक

(४) सहायक दुग्ध शाळा व्यवस्थापक

(५) सहायक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी (तांत्रिक)

(६) दूध प्रापण अधिकारी

(७) प्रशिक्षण अधीक्षक (दुग्धशाळा तंत्रज्ञान)

(८) जीव रसायन शास्त्रज्ञ

(९) सहायक अणुजीव शास्त्रज्ञ

(१०) दुग्धशाळा रसायन शास्त्रज्ञ

(११) प्रशिक्षण अधीक्षक (गुण नियंत्रण)

(१२) सहायक गुणनियंत्रण अधिकारी

(१३) कृषीक्षेत्र अधीक्षक

(१४) सहायक वैरण विकास अधिकारी

(१५) प्रशिक्षण अधीक्षक (दुग्धशाळा पशुसंवर्धन)

(१६) प्रभारी, वासी आगार

(१७) सहायक जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी.

## अनुसूची ८

### वर्ग-३ संवर्गातील पदांची यादी (तांत्रिक गट)

### (वेतनश्रेणी रु. ५,५००—९,०००)

(१) सहायक दुग्धशाळा व्यवस्थापक

(२) पाळी व्यवस्थापक

(३) तंत्र सहायक

(४) चीज संशोधन सहायक

(५) दुग्धशाळा व्यवस्थापक

(६) प्रयोग निर्देशक (दुग्धशाळा तंत्र)

(७) व्यवस्थापक (दूध शीतकरण केंद्र)

(८) दुग्धशाळा उप रसायन शास्त्रज्ञ

(९) दुग्धशाळा उप रसायन शास्त्रज्ञ (अणुजीव)

(१०) जीव रसायन शास्त्रज्ञ

(११) प्रयोग निर्देशक (दुग्धशाळा रसायनशास्त्रज्ञ)

(१२) प्रयोग निर्देशक (दुग्धशाळा अणुजीव शास्त्रज्ञ)

(१३) कृषि अधिकारी

(१४) सहायक कृषि अधिकारी

(१५) प्रयोग निर्देशक (कृषि).

## अनुसूची ९

### वर्ग-२ संवर्गातील पदांची यादी

### (वेतनश्रेणी रु. ६,५००—१०,५००)

(१) सहायक आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास (प्रशासन)

(२) सहाय्यक आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास (सर्वसाधारण)

(३) सहायक अर्थसंकल्प अधिकारी

(४) मेळ अधिकारी

(५) जनसंपर्क अधिकारी

(६) सहायक कार्यकारी अधिकारी

(७) अनुज्ञप्ति अधिकारी

(८) भांडार अधिकारी

(९) प्रशासकीय अधिकारी

(१०) सहायक संचालक (कर्मचारी वृंद)

(११) सहायक संचालक (सर्वसाधारण)

(१२) सहायक संचालक (प्रशासन)

(१३) सहायक प्रकल्प अधिकारी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एम. रमेशकुमार,**

शासनाचे सचिव.